


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड – महाराष्ट्र । रविवार दि. १० मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ५१ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये




RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com







# भूसंपादन घोटाळ्यातल्या अविनाश पाठकाला उच्च न्यायालयाचाही दणका

## अधिकार नसताना सुनावणी; ५० हजारांचा दंड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि मावेजा वाटपातील कथित २४१ कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी पोलीस कोठडीत असलेले तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा दणका दिला आहे. धाराशिव येथे अपर जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन सुनावणी घेतल्याप्रकरणी न्यायालयाने त्यांच्यावर ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.




विशेष म्हणजे, ही रक्कम सरकारी तिजोरीतून नव्हे तर स्वतःच्या खिशातून भरण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे महसूल विभागात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि मावेजा वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित गैरव्यवहार प्रकरणात बीड पोलिसांच्या एसआयटी पथकाने नुकतीच लातूरमधून अविनाश पाठक यांना अटक केली होती. त्यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती सिद्धेश्वर ठोंबरे यांनी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला. ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● न्यायालयाचे स्पष्ट निरीक्षण

**उच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, उपविभागीय दंडाधिकारी जेव्हा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४५ अंतर्गत अधिकार वापरतात, तेव्हा त्या आदेशाविरोधात फक्त फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९७ अंतर्गत सक्षम न्यायालयात पुनरीक्षण अर्ज दाखल करता येतो. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे कलम २५७ अपर जिल्हाधिकाऱ्यांना अशा प्रकारच्या फौजदारी आदेशांवर सुनावणी घेण्याचा अधिकार देत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. अधिकार नसतानाही प्रकरण चालवून आदेश दिल्याबद्दल न्यायालयाने अविनाश पाठक यांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले.**

# येत्या शैक्षणिक वर्षात कोणत्या इयत्तांची पाठ्यपुस्तके बदलणार? कोणत्या इयत्तांना प्रचलित पाठ्यपुस्तकेच?

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे (बालभारती) उपलब्ध करून दिली जाणारी पाठ्यपुस्तकांपैकी काही इयत्तांची पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्ष २०२६-२७मध्ये बदलणार आहेत. त्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांना नवीन पाठ्यपुस्तके लागू होणार असून, इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे शेवटचे वर्ष असणार आहे. बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक यांनी याबाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात जून २०२६ मध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी, आणि सहाव पाठ्यपुस्तके नव्याने प्रकाशित होणार आहेत. त्यामुळे



पालकांनी नवीन अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके खरेदी करावीत. तर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ हे इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे शेवटचे वर्ष असणार आहे. त्यामुळे या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांची खरेदी आवश्यकतेनुसार करावी, अशा सूचना बालभारतीतर्फे संबंधितांना करण्यात आल्या आहेत. इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी व सहावीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमासाठी 'शिकू मराठी आनंदे' तसेच हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, सिंधू, तेलगू, तमिळ आणि बंगाली या इतर माध्यमांसाठी 'करू मैत्री मराठीशी' ही मराठी भाषेची अनिवार्य पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

इयत्ता सहावीसाठी हिंदी सुलभभारती, हिंदी सुगमभारती, तसेच ▶▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्रासह ११ राज्यांना अवकाळी पावसाचा हाय अलर्ट; IMD चा पुढील ४८ तासांसाठी मोठा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

देशातील अनेक राज्यांमध्ये हवामानात अचानक मोठा बदल झाला असून उष्णतेनंतर आता अवकाळी पावसाचा धोका वाढला आहे. भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रासह ११ राज्यांसाठी वादळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्याचा हाय अलर्ट जारी केला आहे.




उष्णतेनंतर आता अवकाळी संकट- गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत उष्णतेची तीव्र लाट जाणवत होती. विदर्भ आणि मराठवाड्यात तापमानाने ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचल्याने नागरिक हैराण झाले होते. मात्र आता हवामानात अचानक बदल झाला असून अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा धोका वाढला आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील ४८ तास अत्यंत महत्त्वाचे असल्याचा इशारा दिला आहे.

महाराष्ट्रासह ११ राज्यांना अलर्ट- IMD च्या अंदाजानुसार महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'टेरेसवर पाण्याची टाकी दाखवतो', वॉचमॅन ४ चिमुकल्या मुलींना ७ व्या मजल्यावर घेऊन गेला; अन्...

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील एका हाउसिंग सोसायटीतून माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत धक्कादायक घटना समोर आलीये. ज्या वॉचमनच्या खांद्यावर संपूर्ण सोसायटीच्या सुरक्षेची जबाबदारी होती, त्यानेच चार निरागस मुलींना आपल्या वासनेचे लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. भोसरी एमआयडीसी पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला गजाआड केले आहे. ही घटना शुक्रवारी दुपारी १ ते २ च्या दरम्यान घडली.



अधिकची माहिती अशी की, आरोपीचे नाव दिनेश चौधरी असून तो सोसायटीत सुरक्षा रक्षक म्हणून रुजू झाला होता आणि त्याचा कामाचा पहिलाच दिवस होता. आरोपीने ६, ८, ८ आणि १० वर्षांच्या चार मुलींना फसवले. ' ▶▶ उर्वरित पान २ वर

# भारताचा दणका अन् चीनचा खोटारडेपणा!

## 1 वर्षानंतर चीनने जगासमोर मान्य केलं ऑपरेशन सिंदूरमधील 'ते' सत्य

**वृत्तसंस्था**

गेल्या वर्षी भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या संघर्षाबाबत चीनने अखेर एक अत्यंत धक्कादायक आणि मोठी कबुली दिली आहे. या युद्धादरम्यान आपण पाकिस्तानला जमिनस्तरावर तांत्रिक सहाय्य दिले होते, हे चीनने पहिल्यांदाच अधिकृतपणे मान्य केले आहे. चीनच्या सरकारी प्रसारक 'CCTV'वर प्रसारित झालेल्या एका मुलाखतीत




चिनी इंजिनिअर्सनी हा खुलासा केला असून, यामुळे भारताच्या दाव्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

'साऊथ चायना मॉर्निंग पोस्ट'ने दिलेल्या वृत्तानुसार, चीनच्या एव्हिएशन इंडस्ट्री कॉर्पोरेशन ऑफ चायनाच्या इंजिनिअर्सनी सांगितले की, 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान ते पाकिस्तानच्या एअरबेसवर उपस्थित होते. इंजिनिअर झांग हेंग यांनी सांगितले ▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईच्या पंधरा वाळूमाफियांवर गुन्हे

**गेवराई । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून केणींद्वारे अवैध वाळू उपसा करणाऱ्या गेवराई तालुक्यातील पंधरा मुख्य वाळूमाफियांवर गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून गेवराई तालुक्यातीलवाळूतस्कर गोदावरी नदीपात्रात पाणी असल्याचा गैरफायदा घेत होते. बीडच्या हद्दीतून नदीपात्रात लांबवर दोरखंड टाकून, 'केणी'द्वारे अंबड ▶▶ उर्वरित पान २ वर

# माझ्या कारला धडक, पुणे-मुंबई प्रवासात धक्कादायक प्रकार; सुप्रिया सुळेंनी शेअर केला 'कार नंबर'

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या कारचा अपघातझाल्याची घटना घडली आहे. पुणे ते मुंबई महामार्गावर प्रवास करत असताना एका वाहनाने सुळे यांच्या कारला धडक दिली आहे. या घटनेनंतर सुप्रिया सुळे यांनी घडलेला प्रसंग सोशल मीडियावर शेअर केल आहे. तसेच त्यांनी ज्या वाहनाने त्यांच्या कारला धडक दिली त्या वाहनाचा नंबर देखील शेअर केला आहे. नेमकं काय



म्हणाल्या सुप्रिया सुळे ते पाहुयात.

काय म्हणाल्या सुप्रिया सुळे? आज पुणे ते मुंबई प्रवास करत असताना, महामार्गावर GJ13CF5257 या वाहनाने बेदरकारपणे गाडी चालवल्यामुळं माझ्या गाडीला बाजूने धडक दिल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. हा एक अत्यंत वाईट अनुभव होता. सुदैवाने, आम्ही सर्वजण सुरक्षित आहेत अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. अशा घटना हा ▶▶ उर्वरित पान २ वर

## आष्टीत मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेच्या कामांचा आढावा

# प्रलंबित रस्ते तातडीने पूर्ण करा; दर्जेदार कामांना प्राधान्य : आ. सुरेश धस



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तहसील कार्यालय येथे मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेअंतर्गत आष्टी विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित व अत्यावश्यक रस्ते कामांचा सविस्तर आढावा बैठक आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) तालुक्यातील गाव व वस्ती जोडणाऱ्या अनेक रस्त्यांची कामे अनेक ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● आ.सुरेश धस यांनी घेतला जलसंधारण कामांचा आढावा

**आष्टी येथे मृदा व जलसंधारण, जलसंपदा व पाटबंधारे विभागाच्या विविध कामांची आढावा बैठक पार पडली. २०२५ मधील अतिवृष्टीमुळे साठवण तलाव, पाझर तलाव व बंधाऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याने दुरुस्ती व खोलीकरणाची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सामाजिक दायित्व निधी व लोकसहभागातून कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने जूनपूर्वी पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. यावेळी बैठकीस उपअभियंता उदमले, विशाल हात्ते, पाटील, पालवणकर, प्रफुल्ल राख, नाम फाउंडेशनचे राजाभाऊ शेळके, सिनारे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.**



## ◆ संपादकीय...

# लाले लाल लाले लाल.... भ्रष्टाचाराची कमाई अन् अधिकारी मालामाल...

विनाश काले विपरीत बुद्धी असे म्हणतात. पण अविनाश नावाच्या पाठक महाशयांनी विपरीत बुद्धी चा वापर करून भ्रष्टाचाराची सीमा ओलांडली आहे. IAS अधिकारी यांना अटक करून कोठडीत रवानगी करण्याची ही प्रथमच वेळ असेल. IAS म्हटले की अलौकिक बुद्धिमत्ता असलेले प्रशासनातील वरिष्ठ पद. या पदाची गरिमां ही फार मोठी असून गोरगरीब शोषित पीडित वंचित घटकांना न्याय देणारे जिल्हा दंडाधिकारी असतात. आता न्याय तर बाजूलाच राहिला पण स्वतः ची टक्केवारी घेण्यात आणि राजकारण्यांची धुनी धुण्यात हे अधिकारी मग्न असतात. जिल्हाधिकारी कार्यालय असो किंवा जिल्हा परिषद कार्यालय असो सर्वत्र टक्केवारीचा बाजार सुरू आहे. गोरगरिबांना लुटा, भ्रष्टाचार करा, शासकीय कामात टक्केवारी घ्या , कर्मचारी यांना दाबा आणि स्वतःचे खिसे भरा अशी या कार्यालयाची अवस्था झाली आहे. अशा भ्रष्ट अधिकाऱ्याकडे स्वतःची एक स्वतंत्र यंत्रणा, लाच जमा करण्यासाठी ठेवलेली माणसे आहेत आणि करोडो रुपये गोळा करायचे असा गोरख धंदा या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत बीड जिल्ह्यामध्ये होत असल्याचे दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातील जनता भोळी भाबडी आहे, येथे राजकीय हेवेदावे आणि एकमेकांवर कुरघोडी करण्यामध्ये बीड जिल्ह्याच्या विकासाचा बळी जात आहे. एका जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याने अशा प्रकारचा भ्रष्टाचार करून शासनाची लूट केली आहे. वास्तविक पाहता या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणाचेही नियंत्रण नाही. मनमानी आणि हुकूमशाही सारखे प्रशासन चालवायचे आणि कोणी आडवा आला तर कायदेशीर मोडायचे अशी अवस्था झाली आहे. शासनाकडून भरपूर सुविधा देऊन देखील या अजगरांचे पोट भरत नाही. खरंच या लाल दिव्याच्या गाडी कडे बघून म्हणावे वाटते, लाले लाल लाले लाल, भ्रष्टाचाराची कमाई आणि अधिकारी मालामाल. बीड काही सुधारत नाही कारण सुधार करणारे पाठक सारखे ठग आहेत जे आपल्या खळग्या भरतात. आज मी आवर्जून सांगतो, जिल्हाधिकारी असो मुख्य कार्यकारी अधिकारी असो किंवा जिल्हा पोलीस अधीक्षक असो हे सर्व जनतेचे सेवक आहेत आणि यांना जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी या उच्च पदावर बसवले आहे. जनतेचे काम केले तर मान द्या नाहीतर यांच्या विरुद्ध देखील कारवाई करण्याचा आपणास अधिकार आहे. खरंतर या उच्च पदाचे अनेक अधिकार गोठवले पाहिजेत. तरच यांचे थाट माट आणि नाटकं कमी होऊन भ्रष्टाचाराला पायबंद बसेल.

# आई : ममतेचा अखंड झरा

मानवी जीवनाच्या प्रवासात अनेक नाती येतात, काही नाती काळाच्या ओघात बदलतात, काही नाती परिस्थितीनुसार दूर जातात; परंतु एक नाते असे असते जे जन्मापूर्वीपासून मृत्यूपर्यंत माणसाला सावलीसारखे साथ देत राहते, ते म्हणजे आईचे नाते. आई ही केवळ जन्मदात्री नसते, तर ती संस्कारांची पहिली शाळा, जीवनमूल्यांची पहिली गुरू, संघर्षात उभी राहणारी पहिली शक्ती आणि संकटसमयी धीर देणारी पहिली मैत्रीण असते. म्हणूनच जगभरात मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मातृ दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक शुभेच्छांचा किंवा सामाजिक माध्यमांवरील संदेशांचा दिवस नसून, आईच्या त्याग, प्रेम, कष्ट आणि ममतेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. आई या शब्दामध्ये संपूर्ण विश्व सामावलेले आहे. एखाद्या बालकाचा जन्म होण्यापूर्वीच आईचे मातृत्व सुरू होते. स्वतःच्या शरीरात नवजीवन वाढवत असताना ती अनेक वेदना सहन करते. त्या वेदना सहन करताना तिच्या मनात भीतीपेक्षा आनंद अधिक असतो, कारण तिच्या पोटी वाढणाऱ्या जीवाबद्दल तिच्या मनात अपरंपार प्रेम असते. बालक जन्माला आल्यानंतर आई त्याचे पालनपोषण करताना स्वतःच्या सुख-दुःखाचा विचारही करत नाही. रात्रभर जागून मुलाला सांभाळणे, त्याच्या प्रत्येक गरजेची काळजी घेणे, त्याच्या आरोग्यापासून शिक्षणापर्यंत प्रत्येक गोष्टीत लक्ष घालणे हे आईचे जीवनकार्य बनते. म्हणूनच जगातील प्रत्येक महान व्यक्तीच्या यशामागे आईचे योगदान मोठे असते. भारतीय कुटुंब व्यवस्थेत आई ही घराचा केंद्रबिंदू मानली जाते. ती घरातील प्रत्येक सदस्याला प्रेमाने जोडून ठेवते. अनेकदा आर्थिक अडचणी, कौटुंबिक तणाव, सामाजिक दबाव अशा संकटांमध्येही आई आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभी राहते. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून ती आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी आयुष्यभर झटत असते. इतिहास आणि साहित्यामध्ये मातृत्वाचे अनेक प्रेरणादायी संदर्भ आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर जिजाऊंच्या संस्कारांचा खोल प्रभाव होता. जिजाऊंनी शिवरायांना स्वराज्याचे स्वप्न दाखवले आणि न्याय, शौर्य, धर्मनिष्ठा यांचे संस्कार दिले. म्हणूनच जिजाऊंना 'राजमाता' म्हणून गौरविले जाते. यावरून आई ही व्यक्तिमत्त्व घडवणारी महान शक्ती असल्याचे स्पष्ट होते.

मातृ दिनाचा इतिहासही अत्यंत प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील ॲना जार्विस या महिलेने आपल्या आईच्या स्मरणार्थ मातृ दिन साजरा करण्याची संकल्पना मांडली. त्यांच्या आई सामाजिक कार्यात सक्रिय होत्या. त्यांच्या निधनानंतर ॲना जार्विस यांनी आईच्या प्रेमाचा आणि मातृत्वाच्या मूल्यांचा गौरव करण्यासाठी विशेष दिवस साजरा करण्याचा आग्रह धरला. अखेरीस १९१४ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मदर्स डे' अधिकृतपणे साजरा करण्याची घोषणा केली. त्यानंतर जगभरात विविध देशांमध्ये मातृ दिन साजरा केला जाऊ लागला.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जग झपाट्याने बदलले आहे. जीवनशैली बदलली, कुटुंबव्यवस्था बदलली, नात्यांचे स्वरूपही बदलले; परंतु आईचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. उलट धकाधकीच्या जीवनात आईची भूमिका अधिक महत्त्वाची बनली आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक जबाबदाऱ्या यांचा ताण वाढत असताना कुटुंब सांभाळण्याची मोठी जबाबदारी आईवर असते. अनेक महिला घर आणि करिअर यांचा समतोल साधत आपल्या कुटुंबासाठी झटताना दिसतात. त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्या तरी घरातील जबाबदाऱ्या कमी झालेल्या नाहीत. त्यामुळे आधुनिक आईचे जीवन अधिक संघर्षमय झाले आहे. ग्रामीण भागातील आईचे जीवन विशेषतः कष्टमय असते. शेतीची कामे, जनावरांची देखभाल, घरातील कामे, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा अनेक जबाबदाऱ्या ती सांभाळत असते. अनेकदा तिला स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठीही वेळ मिळत नाही. तरीही ती तक्रार न करता आपल्या कुटुंबासाठी राबत राहते. ग्रामीण महिलांच्या या श्रमाचे आणि योगदानाचे योग्य मूल्यमापन समाजाने करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अनेक आई मुलांच्या शिक्षणासाठी स्वतः उपाशी राहून त्यांना शिकवतात. त्यामुळेच शिक्षणाच्या माध्यमातून अनेक मुले प्रगतीच्या शिखरावर पोहोचतात.

- डॉ. राजेंद्र बगाटे,

◆ पान ४ वरून पुढे...

## वैद्यनाथ फंड ....

फंड ०.६ पैसे वसूल केला जातो . बाजार समितीच्या सहकार्याने वैद्यनाथ मंदिरा कडून फंड वसूल केला जातो. लायसनच्या वेळेस बाजार समितीकडून वैद्यनाथ फंडाच्या बाबतीत व्यापाऱ्याची अडवणूक केली जाते. सहाय्यक निबंधक परळी व जिल्हा उपनिबंधक बीड हे राजकीय दबावाखाली काम करत असून शासनाच्या आदेशाची नियमानुसार पालन करीत नाहीत त्यामुळे शेतकऱ्याला खूप मोठा त्रास परळी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून वैद्यनाथ फंडाच्या नावाखाली होत आहे. महाराष्ट्र मध्ये एका ही बाजार समितीकडून अतिरिक्त फंड वसूल केला जात नाही . बाजार समितीच्या कायद्यात तरतूद नाही परंतु शासनाचे वेळोवेळी आदेश देऊनही जिल्हा उपनिबंधक व कृषी उत्पन्न बाजार समिती नियमाचे पालन करीत नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

## मोठेवाडीत कायद्याचा...

होत आहे. जर कायद्याचे रक्षकच संशयाच्या भोवऱ्यात सापडले, तर सामान्य माणसाने न्यायासाठी कुणाकडे पाहायचे ? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे. दरम्यान, या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष आणि सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी जोरदार मागणी होत आहे. आरोप सिद्ध झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी, अन्यथा अफवांना पूर्णविराम देण्यासाठी प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. मोठेवाडी परिसरात या प्रकरणाची चर्चा आता चहाच्या टपऱ्यांपासून ग्रामसभांपर्यंत पोहोचली असून, नागरिकांचे लक्ष प्रशासनाच्या पुढील पावलांकडे लागले आहे.

## साधेपणातून समाजाप्रती....

आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. यावेळी भारतीताई यादव, उगले मॅडम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## गंभीर गुन्ह्यातील....

नागरिकांमधून बोलले जात आहे. फरार आरोपी, अवैध धंदे तसेच सराईत गुन्हेगारांवर पोलिसांकडून सातत्याने कारवाई होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ बीड पो.नि.मारोती खेडकर, psi शहा साहेब, पोहवा/ नितीन राठोड, पोहवा/ अजित शिकेतोड, पोअं/ गुजर, पोअं/ परजने, पोअं/ गिरी व DB पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांनी केली.

## डॉ. अजय दादा....

हा शेतकऱ्यांचा विश्वासाचा कारखाना आहे. शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून कारखान्याची वाटचाल सुरू आहे. नव्या संचालक मंडळाच्या माध्यमातून कारखान्याला अधिक सक्षम व प्रगत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपणे, कारखान्याची आर्थिक घडी मजबूत करणे व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्याची प्रगती साधणे हेच आमचे उद्दिष्ट राहील. संचालक मंडळातील सर्व सदस्य अनुभवी असून त्यांच्या सहकार्यामुळे कारखाना नव्या उंचीवर जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच नवनिर्वाचित चेअरमन डॉ. अजय दादा धोंडे यांनी सर्व संचालक मंडळ, सभासद व कार्यकर्त्यांचे आभार मानले. माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत शेतकरी, कामगार आणि सभासद यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम केले जाईल. कारखान्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन पुढे जाऊ, असे त्यांनी सांगितले. यावेळी नवनिर्वाचित संचालक मंडळातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला. नवनिर्वाचित संचालक मंडळ पुढीलप्रमाणे : मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब, श्री. नियामत बेग साहेब, श्री. जगताप संभाजी महादेव, श्री. झगडे सतीश रभाजी, श्री. ॲड. निकाळजे रत्नदीप भिमराव, श्री. गणेश मारुतीराव सांगळे, श्री. शिंदे केशव मच्छिंद्र, श्री. चव्हाण झुंबर मारुती, श्री. कर्डिले बजरंग कोंडीबा, श्री. गावडे गजानन पांडुरंग, श्री. गर्जे शहादेव महादेव, श्री. विधाते उद्धव आनंदराव, श्री. खेडकर अशोक विष्णू, श्री. मोहोळकर तुकाराम रामू, श्री. मुंडे अंकुश चिंतामण, श्रीमती गोल्हार कांती संतोष, श्रीमती नन्नवरे उज्वला संजय, श्री. वाघुले बाबासाहेब गोरख, श्री. दिंडे सदाशिव केरू आदी उपस्थित होते यावेळी सूत्रसंचालन शिवाजी थोरवे आण्णा यांनी केले तर आभार नियमात बेग यांनी मानले. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक गिरीश झगडे, चीप अकाउंटंट सुरेश बोराटे , सोपानराव मुळे, नवनाथ भगत सुरक्षा अधिकारी, मुख्य शेतकी अधिकारी वीरेंद्र गर्जे, रवी भोजने सिव्हिल इंजिनियर, पांडुरंग गावडे माजी संचालक, चीफ केमिस्ट के.डी गर्जे,सभासद, शेतकरी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लिंबागणेश मुख्य....

जात आहे का ? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. या चौकातून दररोज शाळकरी विद्यार्थी, नागरिक आणि वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. प्रशासनाने वेळीच उपाययोजना न केल्यास भविष्यात मोठी जीवितहानी होऊ शकते. त्यास जिल्हा प्रशासन आणि चडठऊ विभाग जबाबदार राहील, असा संतप्त इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## पॉलिसीतून साकारले....

ठरले. त्यांनी केवळ पॉलिसी विक्रीपुरते मर्यादित न राहता, कुटुंबाला दीर्घकालीन आर्थिक नियोजनाची जाणीव करून देत विमा म्हणजे खर्च नव्हे, तर भविष्यासाठीची गुंतवणूक हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केला. त्यांच्या सातत्यपूर्ण सेवेमुळे अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळत असून, हा विवाह त्याचाच उत्कृष्ट नमुना ठरला आहे. आजच्या दिखाऊ खर्चाच्या युगात, हा विवाह सोहळा नियोजन आणि सुरक्षिततेचा संदेश देणारा आदर्श ठरला आहे. यावेळी बोलताना रमेश भोगाडे म्हणाले, आजपासून थोडी बचत - उद्याचा मोठा दिलासा. विमा घ्या, कारण आनंदाच्या क्षणीही भविष्य सुरक्षित ठेवणं तितकंच महत्त्वाचं आहे. या विवाह सोहळ्यास नातेवाईक, मित्रपरिवार व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून वधू-वरांना शुभाशीर्वाद दिले.

◆ पान 9 वरून पुढे...

## भूसंपादन घोटाळ्यातल्या....

नेमके प्रकरण काय ?

कळंब येथील उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी २८ ऑगस्ट २०१७ रोजी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४५ अंतर्गत आदेश पारित केला होता. या आदेशाविरोधात संबंधित प्रतिवादींनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २५७ अंतर्गत अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागितली होती. त्यावेळी अपर जिल्हाधिकारी असलेल्या अविनाश पाठक यांनी या प्रकरणाची सुनावणी घेत उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा आदेश रद्दबातल ठरवला होता. मात्र, हा निर्णय अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन दिल्याचा आरोप करत द्वारकाबाई सुधाकर कोठावळे यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली.महाराष्ट्र पर्यटन शासकीय कर्करोग रुग्णालयात' रक्कम जमा करण्याचे निर्देश- न्यायालयाने ५० हजार रुपयांचा दंड चार आठवड्यांच्या आत औरंगाबाद येथील शासकीय कर्करोग रुग्णालयात जमा करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ड. विक्रम उंद्रे यांनी बाजू मांडली, तर सरकार पक्षातर्फे बी. ए. शिंदे यांनी काम पाहिले.

## येत्या शैक्षणिक....

सुगमभारती (कन्नड संयुक्त) तारुफे उर्दू, सिंधू भारती, तेलुगु सरल भारती, गुजराती साहित्य परिचय ही पुनर्मुद्रण (जुन्या अभ्यासक्रमाची) वैकल्पिक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इयत्ता पाचवी, सातवी व इयत्ता आठवीच्या एकात्मिक आणि नियमित पाठ्यपुस्तकांमधील आशय मूल्यमापन योजना समान आहे. तसेच ही दोन्ही प्रकारची पाठ्यपुस्तके प्रचलित अभ्यासक्रमावर आधारित आहेत. ही पाठ्यपुस्तके भांडारात शिल्लक असून विक्रीसाठी उपलब्ध आहेत, अशी माहिती ओक यांनी दिली.

## महाराष्ट्रासह ११ राज्यांना....

बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि ईशान्येकडील काही राज्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता आहे. काही भागांत मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट आणि ४० ते ६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील कोणत्या भागांना धोका? महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने विशेष इशारा जारी केला आहे.

नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, भंडारा यांसारख्या जिल्ह्यांमध्ये विजांसह वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही भागांत वाऱ्याचा वेग ५० ते ६० किमी प्रतितास राहू शकतो. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने काढणीस आलेली पिके तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवण्याचा सल्ला दिला आहे. तसेच मका, ज्वारी, फळबागा आणि भाजीपाला पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः वादळी वाऱ्यामुळे फळबागा आणि उभ्या पिकांचे नुकसान होऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे. विजांचा कडकडाट आणि झाडे कोसळण्याची शक्यता. IMD ने नागरिकांना अनावश्यक बाहेर पडणे टाळण्याचे आवाहन केले आहे. वादळी वाऱ्यामुळे झाडे कोसळणे, जुन्या इमारतींना धोका निर्माण होणे आणि काही भागांत वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. वादळाच्या वेळी झाडाखाली उभे राहू नये आणि विद्युत उपकरणांपासून दूर राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

मुंबई, पुणे, ठाणे आणि नाशिक परिसरातही ढगाळ वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडू शकतात. उष्णतेनंतर अचानक ढगाळ वातावरण आणि पावसामुळे तापमानात काही प्रमाणात घट होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. अरबी समुद्रातून येणारा ओलावा, कमी दाबाचा पट्टा आणि प्री-मॉन्सून ॲक्टिव्हिटी यामुळे हवामानात हा बदल होत असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. तज्ज्ञांच्या मते, गेल्या काही वर्षांत प्री-मॉन्सून काळात अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. नागरिक आणि शेतकऱ्यांना प्रशासनाचा सल्ला- राज्य प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विजांच्या वेळी मोकळ्या मैदानात जाऊ नये. शेतीची कामे तात्पुरती थांबवावीत. जनावरे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. पिके आणि धान्य झाकून ठेवावे. हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करावे. अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. पुढील दोन ते तीन दिवस महाराष्ट्रासाठी हवामानाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहेत. उष्णतेसोबतच अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचे दुहेरी संकट निर्माण होण्याची शक्यता असल्याने हवामान विभाग सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

## 'टेरेसवर पाण्याची....

टेरेसवर पाण्याची टाकी दाखवतो' असे आमिष दाखवून तो मुलींना इमारतीच्या सातव्या मजल्यावर घेऊन गेला. वर नेल्यानंतर आरोपीने या निरागस मुलींसोबत अश्लील चाळे केले आणि त्यांच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आरोपी तिथेच थांबला नाही. त्याने मुलींना धमकी दिली की, जर ही गोष्ट कोणाला सांगितली तर जीवे मारीन. आरोपीच्या धमकीमुळे घाबरलेल्या मुली घरी परतल्या. मात्र, त्यातील १० वर्षांच्या मुलीने धीर सोडला नाही आणि तिने आईला घडलेला प्रकार सांगितला. पालकांना ही घृणास्पद घटना कळताच त्यांनी तातडीने पोलीस स्टेशन गाठले. भोसरी एमआयडीसी पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ कारवाई केली. आरोपी दिनेश चौधरीविरोधात पोक्सो कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे रहिवासी भागातील मुलांच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप असून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

## भारताचा दणका....

की, मे महिन्यातील ५० अंश सेल्सिअस तापमान आणि सतत वाजत राहणारे एअर-रेड सायरन अशा कठीण परिस्थितीत आमची टीम तिथे तैनात होती. आमचे मुख्य काम चिनी बनावटीची युद्धसामग्री पूर्ण क्षमतेने काम करेल, याची खात्री करणे हे होते.

पाकिस्तानच्या ताफ्यात असलेली चिनी बनावटीची 'J-10CE' ही आधुनिक लढाऊ विमाने या संघर्षात महत्त्वाची ठरली होती. चिनी इंजिनिअर्सनी या विमानांना 'आपल्या मुलाप्रमाणे' असल्याचे सांगत, युद्धाच्या वेळी त्यांच्या कामगिरीवर पूर्ण विश्वास असल्याचे म्हटले. चीनने २०१५ पासून पाकिस्तानला तब्बल ८.२ अब्ज डॉलर्सची शस्त्रे विकली आहेत. विशेष म्हणजे, चीन आपल्या एकूण शस्त्र निर्यातीपैकी ६३ टक्के शस्त्रे एकट्या पाकिस्तानला पुरवतो. २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात भारताचे २६ नागरिक शहीद झाले होते. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केले होते. या कारवाईत जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबासारख्या संघटनांचे १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले होते.

भारतीय लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यापूर्वीच इशारा दिला होता की, पाकिस्तानच्या लष्कराकडील ८१ टक्के शस्त्रे ही चिनी बनावटीची आहेत. चीन पाकिस्तानचा वापर एका 'लाईव्ह लॅब'सारखा करत आहे, जिथे ते आपल्या शस्त्रास्त्रांची युद्धभूमीवरील चाचणी घेतात. आता तर पाकिस्तान चीनकडून ४० 'ग-३५' स्टेल्थ फायटर जेट घेण्याच्या तयारीत आहे. चीनच्या या कबुलीमुळे आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा खळबळ उडाली असून, भारत यावर काय अधिकृत प्रतिक्रिया देतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांनीही यापूर्वीच भारतासाठी चीन हा 'प्राथमिक शत्रू' असल्याचे म्हटले होते, जे आता चिनी इंजिनिअर्सच्या खुलाशानंतर पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## गेवराईच्या पंधरा....

तालुक्याच्या हद्दीतील वाळू ओढून नेली जात होती. यापूर्वी प्रशासनाने १८, १९ आणि २२ एप्रिल रोजी अचानक धाडी टाकून अनेक केण्यांचे दोरखंड कापून जाळून नष्ट केले होते. मात्र, या कारवाईचा तस्करांवर परिणाम न झाल्याने आणि त्यांनी पुन्हा मोठ्या प्रमाणावर यंत्रणा (जेसीबी, पोकलेन, हायवा) लावून शासकीय मालमत्तेची लूट सुरू केल्याने ही कडक पाऊले उचलण्यात आली आहेत. या चौकशीतून हरी रघुनाथ सुखदेव, अंकुश पवार, वैभव डाके, शिवाजी पंडित डाके, रमेश सुखदेव, राजेंद्र बाबूराव डाके, किरण डाके, अशोक सुखदेव, रवी टेकाळे, पवन पठाडे, अजय पठाडे आणि प्रवीण राऊत सर्व माळस पिंपळगाव (ता. गेवराई), बंटी उदे आणि मुकेश कुटे, (सावळेश्वर, ता. गेवराई), शाहरुख अनवर शेख (रा. भांबेरी, ता. अंबड) या व्यतिरिक्त राक्षसभुवन व सुरळेगाव येथील त्यांचे इतर साथीदारही या संघटित गुन्हेगारीत सामील आहेत. ही कारवाई जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

## माझ्या कारला....

एक गंभीर इशारा आहे. अतिवेग आणि निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळं असंख्य लोकांचे जीव धोक्यात येऊ शकतात. सीट बेल्ट लावा, सतर्क राहा आणि जबाबदारीने वाहन चालवा, जेणेकरुन आपले महामार्ग सर्वांसाठी अधिक सुरक्षित होतील असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केलं आहे. दरम्यान, पुणे ते मुंबई प्रवास करत असताना चालक आणि सुळे हे दोघेच गाडीत होते. आम्ही दोघेही सुरक्षीत असल्याची माहिती सुळे यांनी दिली आहे.

## प्रलंबित रस्ते.....

वर्षांपासून अपूर्ण असल्याने शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब बैठकीत समोर आली.

विशेषतः शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी आवश्यक असलेल्या पाणंद रस्त्यांची दयनीय अवस्था गंभीर असून ही कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ. सुरेश धस यांनी संबंधित विभागांना दिल्या. ज्या रस्त्यांवर अतिक्रमणे झाली आहेत ती तात्काळ हटवून रस्त्यांची हद्द निश्चित करावी, प्रलंबित मोजणी प्रक्रिया पूर्ण करावी तसेच दर्जेदार व नियोजनबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. भूमी अभिलेख, महसूल, पंचायत समिती तसेच तांत्रिक विभागांनी समन्वय साधून शेतकरी व ग्रामस्थांना दिलासा मिळेल अशा पद्धतीने कामे तातडीने पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देशही आ. धस यांनी दिले. बैठकीस उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील, तहसीलदार श्री घोळवे, नायब तहसीलदार जोशी, उपाधीक्षक भूमी अभिलेख मोरे, तालुका कृषी अधिकारी तरटे, महसूल मंडळ अधिकारी, तलाठी, सर्वेअर तसेच पंचायत विभागाचे तांत्रिक अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे अध्यक्ष असलेल्या सर्वच विद्यालयांचे दहावी परिक्षेत दैदिप्यमान यश

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रामध्ये दबदबा असणारे बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे अध्यक्ष असलेल्या केज तालुक्यातील सर्वच विद्यालयांनी दहावी बोर्ड परिक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत उज्वल यशाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे.यामध्ये विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केज शहरातील डॉ. विश्वनाथराव कराड विद्यालयचा एकूण निकाल ९८% तर श्री.विठ्ठल माध्यमिक विद्यालय सारणी (सांगवी) ता.केज या शाळेचा एकुण निकाल ९६% लागला आहे तर ४५ विद्यार्थी विषेश प्रविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.तसेच श्री.बाबुराव मुंडे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव ता.केज या शाळेचा एकुण निकाल १००% लागला आहे.तर रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित विश्वनाथराव दराडे निवासी विद्यालय वाघेबाभूळगाव ता.केज शाळेचा निकाल १००% लागला आहे.तसेच गजेराम







मुंडे निवासी विद्यालय केळगाव ता.केज या शाळेचा एकुण निकाल १००% तर रामकृष्ण महाराज निवासी विद्यालय पिंपळगाव ता.केज शाळेचा निकाल १००% लागला आहे.तर मिराबाई शिक्षण प्रसारक मंडळ माळेगांव संचलित बुवासाहेब पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिंदी ता.केज या शाळेचा निकाल ९५.१२% तर श्री.रामकृष्ण महाराज विद्यालय विडा ता.केज या शाळेचा निकाल ९७.७७ % तर माळेगाव हायस्कूल माळेगांव ता.केज या शाळेने ९६.७० % निकाल लावत दहावी बोर्ड परिक्षेतील उज्वल यशाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. दरम्यान परिक्षेत दैदिप्यमान यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष



विक्रम (बप्पा) मुंडे,संस्थेचे अध्यक्ष विजयकांत (भैय्या) मुंडे,संस्थेचे सचिव अतुल (दादा) मुंडे,प्रा.माधुरीताई मुंडे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केज शहरातील प्रा.डॉ.विश्वनाथराव कराड विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेचा एकुण निकाल ९८% लागला असून शाळेतून १) चि.कसबे सुरज विलास ८८.६०% गुण घेऊन (प्रथम) तर २) कु. गालफाडे योगिता सचिन ८६.६०% (दूतिय) ३) चि.घुगे चैतन्य विकास ७५% गुण घेऊन तृतिय क्रमांक पटकावला आहे. दरम्यान शाळेच्या मुख्याध्यापिका प्रा.माधूरीताई मुंडे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व उतिर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री.बाबुराव मुंडे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव ता.केज शाळेचा एकुण निकाल १००% लागला असून शाळेतून १) कु.मुंडे प्रतिक्षा प्रदिप ९१.२०% (प्रथम) २) मुंडे जयेश बाबासाहेब ८५.६० % (दूतिय) तर ३) मुंडे सार्थक मच्छिंद्र ८०.२०% गुण मिळवत तृतिय क्रमांक मिळवला आहे.दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक संजय मुंडे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री.विठ्ठल उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सां) ता.केज शाळेचा एकुण निकाल ९६% लागला असून शाळेतून १) कु. ऋतुजा धनराज केदार ९२.४० % गुण घेऊन (प्रथम) तर रमाकांत अंकुश केदार ९१.६०% (दूतिय) तर कु.ऋतुजा जगन्नाथ घोळवे ९१.२० % गुण घेऊन तृतिय क्रमांक मिळवला आहे.तसेच शाळेतील ४५ विद्यार्थि विषेश प्रविण्यासह उत्तीर्ण झाले असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक सचिन हांगे यांनी अभिनंदन केले आहे.

बुवासाहेब पाटील उच्च माध्यमिक विद्यालय शिंदी ता.केज या शाळेचा एकुण निकाल ९५.१२ % लागला असून शाळेतून १) जगताप प्रशांत बापु ९०.६०% गुण घेऊन (प्रथम) तर २) मनसुखे अपेक्षा दशरथ ८६.४० % (दूतिय) तर ३) काळे कांचन सचिन ८४.४० % गुण घेऊन (तृतिय) क्रमांक पटकावला आहे.दरम्यान शाळेतून विशेष प्राविण्यांसह २० विद्यार्थी,प्रथम श्रेणीतून १० विद्यार्थी, दूतिय श्रेणी तून ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचे मुख्याध्यापक प्रा.सदाशिव मुंडे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री.रामकृष्ण महाराज निवासी विद्यालय विडा ता.केज शाळेचा एकुण निकाल ९७.७७ % लागला असून शाळेतून १) आंधळे कार्तिक पांडुरंग ८७ % (प्रथम) २) पिंगळे वैभवी राजेंद्र ८६.८०% (दूतिय) तर पिंगळे पृथ्वीराज राजेंद्र ८६.४०% गुण घेऊन ( तृतिय) क्रमांक मिळवला आहे.दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक राम काटकर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

माळेगांव हायस्कूल माळेगांव ता.केज शाळेचा एकुण निकाल ९६.७० % लागला असून शाळेतून १ ) चाळक अक्षरा अशोक ८९.६०% (प्रथम) २) पवार वैशाली पद्माकर ८८.२०% (दूतिय) ३) अधर्म गितांजली शरद ८७.६० % गुण घेऊन तृतिय क्रमांक मिळवला आसून शाळेचे मुख्याध्यापक श्री.लोकरे सर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री विश्वनाथराव दराडे निवासी विद्यालय वाघेबाभूळगाव ता.केज शाळेचा एकुण निकाल १००% लागला असून शाळेतून १) बोंदर प्राजक्ता संपत ७३.४०% (प्रथम) २) बारगजे प्रियंका विक्रम ६८.४०%(दूतिय) ३) धूमक अंजली बाळू ६६.८०% गूण मिळवत तृप्ति क्रमांक मिळवला आसून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

रामकृष्ण महाराज निवासी विद्यालय पिंपळगव्हाण ता .केज शाळेचा एकुण निकाल १००% लागला असून शाळेतून १) कु. धुमाळ साक्षी मोहन ८९.८०% (प्रथम) २) धुमाळ संकेत मोहन ७८% (दूतिय) तर ३) भांगे अजिंक्य किशोर ७७.६०% गुण घेऊन तृतिय क्रमांक मिळवला आसून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## वॉर्ड क्रमांक ११ मध्ये 'सय्यद एजाज' यांनाच संधी द्या ; युवक आणि नागरिकांची मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

आगामी नगर परिषद पोट निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून, विशेषतः वॉर्ड क्रमांक ११ मधील उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या वॉर्डमधून माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनाच पुन्हा उमेदवारी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी स्थानिक युवक आणि नागरिकांकडून होत आहे.काही काळापूर्वी झालेल्या निवडणुकीत सय्यद एजाज यांचा अत्यंत अल्प मतांनी पराभव झाला होता. मात्र, पराभवाने खचून न जाता त्यांनी



वॉर्डातील आपला जनसंपर्क अधिक वृद्धिंगत केला. सुख-दु:खाच्या प्रसंगी धावून जाणे असो वा नागरिकांच्या नागरी समस्या सोडवणे, एजाज यांनी सदैव तत्पर राहून कामे केली आहेत. त्यांच्या याच 'लोकाभिमुख' कार्यपद्धतीमुळे आता वॉर्डातील तरुण वर्ग त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.वॉर्डातील विकासाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी एका अभ्यासू आणि सक्रिय नेतृत्वाची गरज आहे. सय्यद एजाज यांनी कार्यकाळात रस्ते, पाणी आणि स्वच्छतेची अनेक विकासकामे मार्गी लावली होती. केवळ नशिबाची साथ नसल्याने गेल्या वेळी त्यांचा विजय थोडक्यात हुकला. मात्र, यावेळी त्यांना संधी दिल्यास ते निश्चितच मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास स्थानिक युवकांनी व्यक्त केला आहे.

## नूतन कोळेश्वर विद्यालयाचा दहावी परीक्षेत ९२.४७ टक्के निकाल

### कॉपीमुक्त व सीसीटीव्हीच्या कडक वातावरणातही विद्यार्थ्यांचे घवघवीत यश ; सूरज दोंदे प्रथम

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोळगाव येथील नूतन कोळेश्वर विद्यामंदिर या शाळेने सन २०२६ च्या दहावी बोर्ड परीक्षेत पुन्हा एकदा उज्वल यशाची परंपरा कायम राखत ९२.४७ टक्के निकालाची दमदार नोंद केली आहे. शुक्रवारी जाहीर झालेल्या माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकालात शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत गावासह परिसराचे नाव उंचावले आहे. यावर्षी शाळेतील एकूण ९४ विद्यार्थी परीक्षेस पात्र होते. त्यापैकी



९३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून ८६ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. विशेष म्हणजे यंदा कॉपीमुक्त वातावरण, सीसीटीव्हीची कडक देखरेख आणि शिस्तबद्ध परीक्षा पद्धती असतानाही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेची गुणवत्ता सिद्ध केली आहे. निकालामध्ये विशेष प्रावीण्य श्रेणीत तब्बल ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीत ४० तर द्वितीय श्रेणीत १५ विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेतून प्रथम येण्याचा मान सूरज बाप्पासाहेब दोंदे याने ८८.४० टक्के गुण मिळवत पटकावला. द्वितीय क्रमांक आदित्य रामचंद्र पवार याने ८६ टक्के गुणांसह मिळविला, तर कु. भक्ती राजेंद्र राऊत हिने ८५.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच तन्मय डोंगरे याला ८५.६० टक्के आणि प्रमोद क्षीरसागर याला ८५.४० टक्के गुण मिळाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थाचालक आदरणीय नावंदे साहेब, संस्थेचे अध्यक्ष विलासरावजी बडगे बापू, शिराम भाऊ, शाळेचे मुख्याध्यापक बागलाने सर, कोळगावचे सरपंच राजेंद्र कदम, पत्रकार बांधव, परिसरातील पालकवर्ग, प्रतिष्ठित नागरिक तसेच शिक्षणप्रेमींनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य लाभल्यामुळेच हा उत्कृष्ट निकाल शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## बीडमध्ये 'संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा' सोहळ्याचे पाचवे पुष्प उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

समाजाने आपल्याला काय दिले, याचा विचार संतांनी कधीच केला नाही. उलट, भरकटलेल्या समाजाला योग्य दिशा देण्याचे महान कार्य संतांनी आपल्या साहित्यातून आणि विचारांतून केले आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी जगाला दिलेला हरिपाठ आणि पसायदान ही मानवासाठी मोठी देणगी आहे. महाराष्ट्राच्या भूमीतील संतांचे शब्द मानवाचे प्रबोधन आणि परिवर्तन घडवून जीवनाचा परिपूर्ण मार्ग दाखवणारे आहेत. हे विचार आजही विश्वाला दिशादर्शक असून, प्रत्येकाने या विचारांचे मनन व चिंतन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन निरुपणकार साध्वी अनुराधा दीदी पंढरपूरकर यांनी येथे केले. येथील स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात 'संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि. ९) या कथा सोहळ्याचे पाचवे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड आणि पदाधिकाऱ्यांच्या हस्ते साध्वी अनुराधा दीदींचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

## पोलीस पाल्यांच्या वयोमर्यादेत वाढ करून 38 वर्षे करा; ॲड. आदर्श जाधव यांची मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांकडे आग्रही मागणी

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील पोलीस पाल्यांच्या भविष्याचा प्रश्न आता ऐरणीवर आला असून, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी ॲड.



आदर्श अरुणराव जाधव यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे राज्य सचिव (लीगल सेल) या नात्याने त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विशेष निवेदन सादर करून पोलीस भरती प्रक्रियेत तातडीने बदल करण्याची मागणी केली आहे.

वयोमर्यादा ३८ करा - पोलीस पाल्यांची प्रमुख मागणी : पोलीस दलात आयुष्यभर सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना सध्याच्या नियमांमुळे आरक्षणाचा लाभ घेताना मोठी कसरत करावी लागत आहे. पोलीस कर्मचारी निवृत्त होईपर्यंत त्यांच्या पाल्याची वयोमर्यादा संपलेली असते, ही वस्तुस्थिती ॲड. आदर्श जाधव यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यामुळे इतर समांतर आरक्षणांप्रमाणेच पोलीस पाल्यांना देखील वयोमर्यादेत सवलत देऊन ती किमान ३८ वर्षांपर्यंत वाढवण्यात यावी, अशी आग्रही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

आरक्षणातील जाचक अटी हटवण्याची गरज: सध्या पोलीस पाल्यांच्या ५% कोट्यातून २% जागा अनुकंपा धारकांसाठी वळवल्या जातात. मात्र, अनुकंपा नियुक्ती ही पूर्णपणे वेगळी प्रक्रिया असल्याने तिचा संबंध पाल्यांच्या आरक्षणाशी जोडू नये, असा तांत्रिक मुद्दा ड. आदर्श जाधव यांनी उपस्थित केला आहे. हा ५% कोटा केवळ पोलीस पाल्यांसाठीच राखीव ठेवावा, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली आहे.

रिक्त जागांच्या माध्यमातून आरक्षण वाढवण्याचा प्रस्ताव: भरती प्रक्रियेत पदवीधर अंशकालीन उमेदवारांच्या अनेक जागा दरवर्षी रिक्त राहतात. या रिक्त जागांपैकी २% ते ३% जागा पोलीस पाल्यांच्या कोट्यात वर्ग केल्यास हे आरक्षण ७% ते ८% पर्यंत जाऊ शकते. यामुळे गरजू पाल्यांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होईल, असा विश्वास ॲड. आदर्श जाधव यांनी व्यक्त केला आहे.

पोलीस कुटुंबांना आधार देण्यासाठी वयोमर्यादेतील सवलत हा कळीचा मुद्दा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यावर सकारात्मक निर्णय घेऊन आगामी भरतीत पोलीस पाल्यांना मोठा दिलासा देतील, अशी आमची अपेक्षा आहे. - ॲड. आदर्श अरुणराव जाधव (राज्य सचिव, लीगल सेल)

## विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करिअरची निवड होणे आवश्यक : प्रो. डॉ. सतीश दांडगे

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना समजून घेऊन पालक व शिक्षकांनी त्यांच्या करिअरबाबत योग्य मार्गदर्शन करण्याची आज मोठी गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगळी क्षमता असते, ती ओळखून त्याला योग्य क्षेत्राची निवड करून देणे महत्त्वाचे आहे. पालकांनी मुलांवर केवळ अपेक्षांचे ओझे न टाकता त्यांच्या आवडीनुसार त्यांना प्रोत्साहन दिल्यास ते जीवनात निश्चितच मोठे यश संपादन करू शकतात, असे प्रतिपादन प्रो.डॉ.सतीश दांडगे यांनी केले. देवगिरी प्रतिष्ठान



संचलित तुलसी इंग्लिश स्कूल व तुलसी कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा तुलसी समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, प्रा. संजय खाडे, प्राचार्या उमा जगतकर, प्राचार्य प्रा. प्रकाश ढोकणे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, क्षेत्र कोणतेही असो, त्या क्षेत्रातील सर्वोच्च यश संपादन करण्याचे ध्येय विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे. मोबाईल व वेळेचा सदुपयोग करून मेहनत, वाचन आणि कौशल्य विकासावर भर दिल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी स्वयंप्रकाशित होऊन स्वतःचे करिअर स्वतः घडवावे. जगात बदल घडवायचा असेल तर प्रथम स्वतःमध्ये बदल घडवावा लागतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी प्रा. संजय खाडे यांनी विद्यार्थ्यांना बारावीनंतरच्या विविध अभ्यासक्रम, करिअरच्या संधी तसेच गएए आणि छएएढ सारख्या स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रकाश ढोकणे यांनी महाविद्यालयाच्या उज्वल निकालाचा गौरव केला व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, तुलसी समूहाचे पुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद सिद्धीक यांनी केले. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मोठेवाडीच्या सरिता खेत्री हिचे घवघवीत यश ; महात्मा फुले विद्यालयात द्वितीय क्रमांक

**माजलगाव । प्रतिनिधी**

मोठेवाडी परिसरातील महात्मा फुले विद्यालय येथील विद्यार्थिनी कु. सरिता जगन्नाथ खेत्री हिने



उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करत विद्यालयात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयासह संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सरिता हिने सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. शिक्षणाबद्दलची तिची आवड, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा मिळालेला पाठिंबा यामुळे ती हे यश मिळवू शकली. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून शिक्षण क्षेत्रात प्रगती करण्याची नवी उमेद निर्माण झाली आहे. विद्यालयातील शिक्षकांनी सरिताचे विशेष कौतुक करत तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही यश मिळवता येते, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले. गावातील नागरिकांनीही सरिताच्या यशाचा आनंद साजरा करत तिचे अभिनंदन केले. कु. सरिता जगन्नाथ खेत्री हिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून मोठेवाडीच्या शैक्षणिक परंपरेला नवी ओळख मिळाली आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र

▸▸ रविवार, दि. १० मे २०२६ ▸▸ Page 4

## वैद्यनाथ फंड रद्द करण्याचे आदेशाची तात्काळ अमलबजावणी करा.वसंत मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या पट्टीमधून वैद्यनाथ फंड वसूल करू नये असे आदेश असूनही कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ मार्फत कारवाई केली जात नसल्यास शासनाकडे तक्रार दाखल करणार असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सांगितले. पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि. २०डिसेंबर २०१४ ला शेतकऱ्याकडून कोणत्याही सेवा शुल्क वसूल न करण्याची आदेश दिलेले आहेत परंतु परळी वैजनाथ कृषी उत्पन्न बाजार समिती कडून कारवाई केली जात नाही. शेतकऱ्याच्या शेती मालाच्या खरेदी विक्रीच्या बाजार समितीच्या पट्टीमधून वैद्यनाथ ▶▶ उर्वरित पान २ वर

# बळेवाडी तलावातून आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतून

# 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेचा शुभारंभ

## सुपीक गाळाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे : गणेश शिंदे



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बाळेवाडी येथे मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून व नियोजनातून बळेवाडी येथील महाराष्ट्र शासनाच्या साठवण तलावामध्ये गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या महत्त्वपूर्ण योजनेचा शुभारंभ शुक्रवार दि. ९ मे रोजी या योजनेचा शुभारंभ भारतीय जनता पार्टी प्रमुख गणेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. आमदार सुरेश धस यांनी या परिसरातील शेतकऱ्यांना या तलावातील गाळाचा लाभ मिळावा यासाठीगाळमुक्त धरण,गाळयुक्त शिवार या योजनेसाठी पाठपुरावा करून या योजनेचा फायदा होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या या योजनेमुळे तलावातील गाळ काढून पाणी साठवण क्षमतेत मोठी वाढ होणार आहे.तसेच तलावातील सुपीक गाळ मुरूम, चुनखडकयुक्त, अतिपावसामुळे खराब झालेल्या तसेच नापीक जमिनीवर टाकल्यास जमिनीची सुपीकता वाढून शेती उत्पादनात मोठी वाढ होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

तलावातील गाळ पूर्णपणे काढल्यास सध्याच्या तुलनेत दुप्पट पाणी साठवण क्षमता वाढू शकते, असे गणेश शिंदे यांनी सांगितले.

बळेवाडी तलावातील गाळाचा लाभ बळेवाडी, पारगाव जोगेश्वरी, खडकत, सांगवी, वाळूज, टाकळसिंग आदी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास आष्टी तालुका दूध संघाचे संचालक चेअरमन गणेश मोकाशे,जलसंपदा विभागाचे सचिन आजबे, बळेवाडी साठवण तलावाचे व्यवस्थापक वसंत भोसले, निशांत जेवे, अशोक दिनकर भोसले,बद्रीनाथ भोसले, दिपक भोसले, सुरेश भोसले, वनविभाग कर्जतचे काकासाहेब भोसले, कल्याण झराड, सुदाम आजबे, लहू भोसले,नाना पोटफोडे, बारीकराव झराड, गणेश भोसले, देवीदास भोसले, गहिनाथ भोसले, रामदास भोसले, देवराव भोसले, पांडुरंग झराड, ज्ञानेश्वर झराड, संजय भोसले, बापूराव बळे, बापू काशीनाथ भोसले, राजेंद्र निगुडे यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोठेवाडीत कायद्याचा बाजार ?

### आरोपींना अभय दिल्याच्या चर्चेमुळे पोलिस यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात

**माजलगाव । प्रतिनिधी**

मोठेवाडी बिट परिसरात सुरू असलेल्या कथित गैरकारभाराच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेवरच आता गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही प्रकरणांमध्ये आरोपींवर कठोर कारवाई होण्याऐवजी आर्थिक व्यवहारातून त्यांना मोकळे सोडण्यात आल्याच्या चर्चेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सामान्य नागरिकांवर तत्काळ कारवाई करणारी यंत्रणा काही प्रभावशाली आरोपींसमोर मात्र नरमाईची भूमिका घेत असल्याची भावना निर्माण झाली आहे. पैसा असेल तर गुन्हेगारही सुरक्षित आणि गरीबांसाठी वेगळे नियम, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. या चर्चांमुळे पोलिस दलाच्या प्रतिमेलाच तडा जात असल्याचे मतही व्यक्त होत आहे. काही नागरिकांनी आरोप केला की, अनेक वेळा तक्रारी असूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याने लोकांचा कायद्यावरील विश्वास डळमळीत ▶▶उर्वरितपान२वर

## साधेपणातून समाजाप्रती योगदान!

### डॉ. गौरी सागर धस यांच्याकडून श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिरासाठी ५ लाखांची देणगी



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांचे चिरंजीव युवा नेतृत्व सागर सुरेश धस व डॉ. गौरी पांडुळे यांचा विवाह नुकताच नाशिक येथे अत्यंत साध्या पद्धतीने संपन्न झाला. अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक बांधिलकी जपत नवदांपत्याने एक आदर्श निर्माण केला आहे. याच औचित्य साधून डॉ. गौरी सागर धस यांनी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड सावरगाव (मायंबा) देवस्थानच्या भव्य मंदिर नवनिर्माण व जीर्णोद्धार कार्यासाठी तब्बल ५ लाख रुपयांची देणगी दिली. ही देणगी ट्रस्टचे अध्यक्ष दादासाहेब चितळे व सावरगावचे उपसरपंच मस्के यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. समाजासाठी काहीतरी देण्याची भावना आणि धार्मिक कार्यात योगदान देण्याचा आदर्श या माध्यमातून नवदांपत्याने जपला ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड चे नारायण चौधरी यांची मुलगी सौं. का अन्विता व चि. रोहित कडू यांच्या विवाह प्रसंगी नवं दाम्पत्यास शुभेच्छा देतांना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, नारायण चौधरी, रोहित चौधरी, आराध्या, तनश्री नरनाळे, आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

## गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीस ठोकल्या बेड्या

### पेठ बीड पोलिसांची धडाकेबाज कारवाई ; गुन्हेगारांसह अवैध धंद्यावर पोलिसांचा वाढता दबाव

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पेठ बीड पोलीस ठाण्याकडून अवैध धंदे, गुन्हेगार तसेच फरार आरोपींविरोधात सातत्याने कठोर कारवाया सुरू आहेत. मागील काही दिवसांपासून पोलीस प्रशासनाने विविध गुन्ह्यातील आरोपींवर धडक मोहीम राबविल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



याच पार्श्वभूमीवर पेठ बीड पोलीस ठाण्यात विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये दाखल असलेला फरार आरोपी सय्यद मुक्तार उर्फ मुक्कन सय्यद मंजूर अली यास पोलिसांनी जेरबंद केले. संबंधित आरोपी हा तब्बल सहा महिन्यांपासून फरार होता. आरोपीचा शोध घेण्यासाठी डीबी पथकाकडून सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अखेर गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून आरोपीस ताब्यात घेण्यात आले. पेठ बीड पोलिसांकडून सुरू असलेल्या या कारवायांमुळे शहरातील गुन्हेगारीवर अंकुश बसत असल्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## डॉ. अजय दादा धोंडे यांची महेश सहकारी साखर कारखाना चेअरमनपदी तर दादासाहेब जगताप यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड



**आष्टी । प्रतिनिधी**

महेश सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी डॉ. अजय दादा धोंडे यांची तर व्हाईस चेअरमनपदी दादासाहेब जगताप यांची बिनविरोध निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवड प्रक्रियेनंतर उपस्थित संचालक मंडळ, सभासद व कार्यकर्त्यांनी जल्लोष करत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

ही निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी भारती ठाकूर प्रादेशिक उप संचालक साखर छत्रपती संभाजी नगर, सहाय्यक निवडणूक अधिकारी बाळकृष्ण शिंदे सहायक निबंधक अहिल्या नगर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. निवड प्रक्रिया शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या निवडीनंतर कारखाना परिसरात अनेक मान्यवरांनी डॉ. अजय दादा धोंडे व दादासाहेब जगताप यांना शुभेच्छा देत आगामी काळात कारखान्याच्या प्रगतीसाठी उत्तम कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी बोलताना माजी आमदार भीमरावजी धोंडे म्हणाले की, महेश सहकारी साखर कारखाना ▶▶उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश मुख्य चौक पुन्हा रक्तरंजित; गतिरोधकाअभावी अपघातांची मालिका सुरूच

### रस्ते सुरक्षा समितीच्या आदेशालाही MSRDC कडून केराची टोपली ? ग्रामस्थांचा संताप : डॉ.गणेश ढवळे


**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी अहमदपूर-अहिल्यानगर मार्गावरील लिंबागणेश येथील मुख्यचौकात काल दि.०८ शुक्रवारी रात्री सुमारे पाऊणे नऊ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. बजाज कंपनीची डिस्कवर दुचाकी आणि सुझुकी कंपनीची स्विफ्ट कार यांच्यात जोरदार धडक होऊन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. अपघातात त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता. स्थानिक नागरिक व प्रत्यक्षदर्शींनी तत्काळ



धाव घेत जखमी युवकाला रुग्णवाहिकेद्वारे बीड येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली असली तरी परिसरात भीतीचे वातावरण





निर्माण झाले आहे. दरम्यान, लिंबागणेश मुख्यचौकात वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे डॉ . गणेश ढवळे आणि हरिओम क्षीरसागर यांच्या पुढाकाराने ग्रामस्थांनी अनेक वेळा आंदोलन करून गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर दि.२६ जुन २०२५ रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि रस्ता सुरक्षा समितीचे सचिव कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड रविंद्र तोंडे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केली होती. या अनुषंगाने त्यांच्या अहवालानंतर जिल्हाधिकारी तथा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष विवेक जॉन्सन यांनी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (चडठऊ) यांना संबंधित ठिकाणी गतिरोधक उभारण्याचे लेखी आदेश दिले होते. मात्र, आदेशानंतर तब्बल ६ महिने उलटूनही चडठऊ विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशालाच जाणीवपूर्वक केराची टोपली दाखवली ▶▶ उर्वरित पान २ वर

## पॉलिसीतून साकारले स्वप्नवत लग्न; वधू-वरांसाठी विम्याची अनोखी भेट!

### आष्टीतील गायत्री–आकाश विवाह सोहळा ठरला आर्थिक नियोजनाचा आदर्श ; विमा प्रतिनिधी रमेश भोगाडे यांच्या कार्याची दखल

**आष्टी । प्रतिनिधी**

बदलत्या काळात वाढत्या खर्चामुळे विवाह सोहळे अनेकदा आर्थिक ताणाचे कारण ठरत असताना, आष्टी येथील चि.सौ. कां. गायत्री मंगला संदीप उगले (पाटील) व चि. आकाश संगीता नारायण पाटेकर (पाटील) यांचा विवाह एक वेगळाच आदर्श निर्माण करत शनिवार, दिनांक ०९ मे २०२६ रोजी आराज मल्टीपर्पज हॉल, आष्टी (खडकत रोड), ता. आष्टी, जि. बीड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या विवाह सोहळ्याची विशेष बाब म्हणजे संपूर्ण लग्न खर्च डखउ सुकन्या पॉलिसीच्या माध्यमातून नियोजनपूर्वक उभारण्यात आला



होता. त्यामुळे कोणताही आर्थिक ताण न येता, कुटुंबाने आनंदाने हा सोहळा पार पाडला. आजच्या काळात नियोजनशून्य खर्चामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी होतात; मात्र उगले कुटुंबांनी दूरदृष्टी दाखवत योग्य वेळी केलेल्या गुंतवणुकीतून हा विवाह साकार केला. याहूनही विशेष म्हणजे, विवाहदिनी वधू-वरांसाठी नवीन विमा पॉलिसी काढून त्यांना आयुष्यभराच्या आर्थिक सुरक्षिततेची अनोखी भेट देण्यात आली. या अभिनव उपक्रमाने उपस्थितांमध्ये विशेष आकर्षण निर्माण केले. या संपूर्ण उपक्रमामागे विमा प्रतिनिधी रमेश भोगाडे यांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ▶▶ उर्वरित पान २ वर